# मराठी
# शब्दसंपदाकोश



डॉ. उषा खंदारे

# मनोगत

'मराठी शब्दसंपदा कोश' हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हातात देताना मला अतिशय आनंद होत आहे. कोणतीही भाषा शिकायची असेल तर त्यासाठी त्या भाषेतील शब्दभांडाराची अत्यंत आवश्यकता असते. विपुल शब्दभांडारामुळेच ती भाषा समृद्ध होत असते. विद्यार्थ्यांना मराठी भाषा शिकण्यासाठी प्राथमिक काळात जास्तीत जास्त शब्दांची अत्यंत आवश्यकता असते. या पुस्तकरूपाने विद्यार्थ्यांना शब्दांचा खजिनाच मिळेल असा विश्वास वाटतो. मराठी शब्दसागरातील हे मोती विद्यार्थ्यांपुढे मी ठेवलेले आहेत.

या संग्रहात विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील असे रोजच्या जीवनातील असंख्य शब्द समाविष्ट केले आहेत. विद्यार्थ्यांना शब्द पाहणे सुलभ व्हावे यासाठी त्यांची वर्णाक्षराप्रमाणे मांडणी केली आहे. विद्यार्थ्यांना निबंधलेखन व पत्रलेखन करताना या वाक्प्रचारांचा व म्हणींचा अनेक ठिकाणी उपयोग करता येईल.

या पुस्तकात पाठ्यपुस्तकातील पाठांतर आधारित समानार्थी शब्द, विरूद्ध अर्थाचे शब्द, जोडशब्द, शब्द समूहाबद्दल एक शब्द, वाक्प्रचार व म्हणी यांचा समावेश तर केला आहेच, शिवाय इतरही अनेक शब्द अंतर्भूत केले आहेत. तसेच संस्कृत सुभाषिते व त्यांचा मराठीत अर्थ दिला आहे. केवळ विद्यार्थ्यांना परीक्षेत चांगले गुण मिळावेत हा हेतू नसून विद्यार्थ्यांचे शब्दभांडार अधिकाधिक समृद्ध व्हावे आणि त्यांना मराठी शब्दमौक्तिकांची व्यापकतेने माहिती व्हावी, हा प्रमुख हेतू आहे.

हे पुस्तक सखोल ज्ञानाच्या दृष्टीने उपयुक्त तर होईलच परंतु जे इतर भाषिक आहेत, ज्यांना मराठी भाषा शिकण्याची आवड व इच्छा आहे, त्यांनाही या पुस्तकाचा अतिशय चांगला उपयोग होईल. वाक्प्रचार व म्हणी यांचा अर्थ अगदी सोप्या, सुटसुटीत शब्दांत सांगितल्यामुळे प्राथमिक विभाग व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांना शब्द व शब्दसमूह आत्मसात करण्यासाठीही या पुस्तकाचा उपयोग होईल.

मराठी भाषेचा सखोल अभ्यास करण्याची इच्छा बहुतेकांना असतेच.

कोणत्याही भाषेतील मर्म उत्तम रीतीने कळण्यास त्या भाषेतील शब्दभांडाराचे ज्ञान आवश्यक असते. या पुस्तकामुळे विद्यार्थ्यांच्या शब्दभांडारात भर तर पडेलच शिवाय अनेक नवीन शब्दांची ओळखही होईल. एखादा नवीन वाक्प्रचार, नवीन म्हण माहीत होऊन विद्यार्थ्यांना निर्भेळ आनंद निश्चितच मिळेल.

पुष्कळ वेळा इंग्रजी, हिंदी, तामिळ, तेलगू यासारख्या माध्यमांतून विद्यार्थी शिक्षण घेत असतात. त्यांना मराठी भाषेतील समानार्थी, विरूद्धार्थी शब्द तितकेसे माहीत नसतात. अशा वेळी विद्यार्थी गोंधळून जातात. इंग्रजी वा इतर शब्दच समानार्थी म्हणून वापरतात. अशा विद्यार्थ्यांना या पुस्तकाचा उपयोग जास्तीत जास्त होईल अशी आशा वाटते.

**- डॉ. उषा खंदारे**

# अनुक्रम


समानार्थी शब्द ........ ११

विरूद्ध अर्थाचे शब्द ........ ४४

जोडशब्द ........ ५६

शब्दसमूहाबद्दल एक शब्द ........ ७१

एक शब्द अनेक अर्थ ........ ९८

वाक्प्रचार ........ १४७

म्हणी ........ २०६

संस्कृत सुभाषिते व त्यांचा अर्थ ........ २३२




**डॉ. उषा खंदारे**

एम.ए., एम.एड., पीएच. डी.


या संग्रहात विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील असे रोजच्या जीवनातील असंख्य शब्द समाविष्ट केले आहेत. विद्यार्थ्यांना शब्द पाहणे सुलभ व्हावे यासाठी त्यांची वर्णाक्षराप्रमाणे मांडणी केली आहे. विद्यार्थ्यांना निबंधलेखन व पत्रलेखन करताना या वाक्प्रचारांचा व म्हणींचा अनेक ठिकाणी उपयोग करता येईल.

या पुस्तकात पाठ्यपुस्तकातील पाठांतर आधारित समानार्थी शब्द, विरूद्ध अर्थाचे शब्द, जोडशब्द, शब्द समूहाबद्दल एक शब्द, वाक्प्रचार व म्हणी यांचा समावेश तर केला आहेच, शिवाय इतरही अनेक शब्द अंतर्भूत केले आहेत. तसेच संस्कृत सुभाषिते व त्यांचा मराठीत अर्थ दिला आहे. केवळ विद्यार्थ्यांना परीक्षेत चांगले गुण मिळावेत हा हेतू नसून विद्यार्थ्यांचे शब्दभांडार अधिकाधिक समृद्ध व्हावे आणि त्यांना मराठी शब्दमौक्तिकांची व्यापकतेने माहिती व्हावी, हा प्रमुख हेतू आहे.

हे पुस्तक सखोल ज्ञानाच्या दृष्टीने उपयुक्त तर होईलच परंतु जे इतर भाषिक आहेत, ज्यांना मराठी भाषा शिकण्याची आवड व इच्छा आहे, त्यांनाही या पुस्तकाचा अतिशय चांगला उपयोग होईल. वाक्प्रचार व म्हणी यांचा अर्थ अगदी सोप्या, सुटसुटीत शब्दांत सांगितल्यामुळे प्राथमिक विभाग व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांना शब्द व शब्दसमूह आत्मसात करण्यासाठीही या पुस्तकाचा उपयोग होईल.

- डॉ. उषा खंदारे


कोमल प्रकाशन